महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 374 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 14 / 10 / 2024

---

## 1)जबरी चोरी :–

**विमानतळ** :–दिनांक 13.10.2024 रोजी सकाळी 08.30 वा. चे सुमारास, **गुरूकृपा दुध डेअरी जवळ जिजाऊनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे ताब्यातील होण्डा ॲक्टीव्हा स्कुटी क्रमांक एमएच–26 / सीएफ–1800 वर बसुन ऐलन क्लासेस येथुन घराकडे जात असतांना गुरूकृपा दुध डेअरी जवळ जिजाऊनगर येथे रोडवर आला असता एका लाल रंगाची मोटार सायकलवर बसुन अज्ञात आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन माझे गाडीतील पेट्रोल संपले आहे माझ्या सोबत पेट्रोल आणायला चल असे म्हणाला तेव्हा फिर्यादीने स्कुटी थांबवुन त्यास तुम्ही कोण आहात असे विचारत असतांना अचानक त्यांने फिर्यादीचे गळयातील 14 ग्रॅम सोन्याचे पेंडाल किंमती 70,000 / –रू चे जबरीने हिसकावुन गाडीवर बसुन चैन घेवुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी तिरूमल केशव मुद्येवाड, वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. शारदानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 21 / 2024 कलम 309, (4) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री राठोड, मो. नं. 8329691061** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**तामसा** :–दिनांक 12.10.2024 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **वायपना खु. फिर्यादीचे घरा समोर ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे **1.अशोक भुजंगराव कदम 2)संदीप भुजंगराव कदम, वय वर्षे, दोघे रा. वायफणा खु. ता. हदगांव जि. नांदेड** यातील फिर्यादीने गावात विजयकुमार शामराव कदम हे मुलांच्या वाढदिवसाच्याा कार्यक्रमात बौध्दाचार्य विधी संकल्प करून घराकडे जात असतांना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून दारू पिऊन तुझे थोबाड बघुत असे म्हणुन वाकडे बोलुन तुम्ही कोणत्याही कार्यक्रमात आम्हाला बोलवत नाही म्हणुन शिवीगाळ करून थापड बुकयांनी मारहाण करून गळयाजवळ चावा घेतला. फिर्यादीचा भाऊ मध्यस्ती करीता आला असता आरोपीतांनी लाथा बुक्यांनी मारहाण करून ढकलुन दिले व काठीने मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शंकर नामदेव कदम, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. वायपना खु. ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 116 / 2024 कलम 118(2), 115(2), 351(2)(3), 352, 3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री डुडूळे, मो. नं. 9022037761** हे करीत आहेत.

## 3)खंडणी :–

**वजिराबाद** :–दिनांक 19.03.2024 रोजी 14.00 ते 15.00 वा. चे दरम्यान, **धर्मादाय आयुक्त कार्यालय गवळीपुरा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस भेटुन तुमच्या आधार कार्डवरील जन्म वर्षावरून आपले वय 82 वर्षाचे दिसत आहे. त्यामुळे ही जर बातमी लपवुन ठेवायची असेल तर तुम्हाला 50,000 / –रू द्यावे लागतील जर पैसे दिले नाही तर पेपरला बातमी लावणार अशी धमकी देवुन खंडणीची मागणी केली. वगैरे **फिर्यादी निलाबाई बबनराव जाधव, व्यवसाय नौकरी सेविका रा. उमरदरी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 502 / 2024 कलम 385 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री मंठाळे, मो.क्रं. 8237703777** हे करीत आहेत.

## 4)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**इतवारा** :– दिनांक 13.10.2024 रोजी 05.30 वा. चे सुमारास, **चुना भट्टी इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने गोवंश जातीचे दोन बैल किंमती 80,000 / –रूपयाचे विना परवाना बेकायदेशीररित्या त्यांची महिंद्रा मॅक्स कंपनीचे वाहन क्रमांक एमएच–28 / एच–6729 किंमती 2,50,000 / –रूपयाचे वाहनामध्ये डांबून त्यांना इजा, यातना होईल अशा रितीने क्रुरतेने वागणुक देवून वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि / मिर्झा अक्तर बेग मिर्झा खासीम बेग, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 373 / 2024 कलम 11(1)(ड),11(1)(ई) प्राण्याचा छळ प्रतिबंध कायादा कायदा सह कलम 83 / 77 मोटार वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1988 मानेकर,** मो.क्रं. 9767002111 हे करीत आहेत.

## 5)अवैध गुटखा बाळगला :–

**कंधार :–** दिनांक 13.10.2024 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **नांदेड ते कंधार येणारे सार्वजनिक रोडवर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे स्वतःचे आर्थीक लाभासाठी विना परवाना बेकायदेशिररित्या विमल पान मसाला कंपणीचा गुटखा, किंमती 15,600/–रूपयाचा माल मो. सा. क्रमांक एमएच–26/जे–7323 किंमती 15,000/–रू ची वर वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2059 शिवाजी एकनाथराव सानप, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 337/2024 कलम 123, भारतीय न्याय संहिता –2023 सह 59 अन्न सुरक्षा मानदे कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कोकाटे, मो.क्रं. 9049350158** हे करीत आहेत.

## 6)जुगार :–

**रामतिर्थ :–** दिनांक 13.10.2024 रोजी 01.45 वा. चे सुमारास, **मौ. आदमपुर येथील यादव कोकणे यांचे घरासमोरील शेडमध्ये ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.गणेश मनोहर जाधव, वय 26 वर्षे, रा. अटकळी 2.देविदास गोविंद देवकरे, वय 35 वर्षे, 3. राजेश सुग्रीव कोल्हे, वय 33 वर्षे, 4.यादव तुकाराम कोकणे, वय 39 वर्षे, तीघे रा. आदमपुर ता. बिलोली जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररीत्या गोलाकार बसुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 16,200/–रू व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2538 व्यंकट हाणमंतराव बोडके, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 25/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2154 मुंडगे, मो. नं. 7507747000** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**मुक्रामाबाद :–** दिनांक 13.10.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहाते घराचे बाजुस मोकळया जागेत मौ. दापका गुंडा तांडा ता. मुखेड** जि. **नांदेड येथे,** यातील आरोपी महीला रा. दापका गुंडोपंत तांडा ता. मुखेड जि. नांदेड यांनी विना परवाना बेकायदेशिररित्या गावठी दारू किंमती 2,000/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेली मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/468 माधव रमेशराव मलगीरवार, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 217/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068 कागणे, मो.नं. 8459537419** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड